नियमित दिवाणी दावा क्र.३९४/२०१४
नि.क्र.१३६/ क (सोबत)

प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र.१

**उलटतपास वादीतर्फे वकील श्री. यु.एस. जाधव यांचेमार्फत शपथेवर सुरु.**

१. मी १९७९ साली दहावी पास झालेलो आहे. राजकुमार माझ्यापेक्षा मोठा आहे. प्रतिवादी क्र.१ प्रभावती ही माझी पत्नी असून तिला बी.पी. व शुगरचा त्रास आहे व तिला चक्कर देखील येत असते. तिला हिंडता, फिरता व बोलता येतो. प्रभावतीला सदरचे आजार असल्याबाबतचे डॉक्टरचे सर्टीफिकेट माझ्याकडे नाही. प्रभावती याना लिहीता, वाचता येत नाही. सदर दाव्यास प्रतिवादीनी काय उत्तर दिले आहे याची मला संपूर्ण माहिती आहे. ऑगस्ट-२०२५ पुर्वी कोर्टाच्या तारखेला आम्ही दोघेही येत होतो. आता मला जे अधिकार पत्र दाखवण्यात ते माझ्या पत्नीने माझ्या हक्कात करुन दिले आहे. त्यास **नि.क्र.१३७** देण्यात येते. हे म्हणणे खरे नाही की, प्रभावती कोर्टात आल्यावर खरे सांगेल या भितीने मी तिच्याकडून अधिकार पत्र करुन घेतले आहे.

२. दि.१६/८/२००२ रोजी प्रभावतीच्या नावे खरेदीखत करुन घेत असताना मी तिच्यासोबत होतो. सदर खरेदीखतावर माझी सही आहे किंवा नाही याबाबत मला आठवत नाही. माझे वडील व वादीचे वडील हे सख्खे भाऊ आहेत. मला तीन भाऊ आहेत. प्रतिवादी क्र.२ गुंडेराव हा वादीचा मोठा भाऊ आहे. शिवाजी सिद्राम मोरे हे शिरोळचे लहानपणापासून रहिवासी आहेत. अविनाश जाधव हे देखील जन्मापासून शिरोळ गावचे रहिवासी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, शिवाजी मोरे व अविनाश जाधव हे प्रतिवादी क्र.३ व वादी यांना पुर्वीपासून ओळखतात. प्रभावतीच्या नावे गट क्र.३०७ क्षेत्र १ हे. १ आर चे खरेदीखत नोंद होण्यापुर्वी लेखी ठराव झाला होता. सदर ठरावपत्र माझ्याकडे आहे. सदर ठरावपत्र हे खरेदीखताच्या किती दिवस आधी झाले होते हे मला आठवत नाही. ठरावाच्यादिवशी काही रक्कम आम्ही दिली होती, परंतु किती दिली होती हे मला आठवत नाही. खरेदीखताच्यादिवशी काही रक्कम दिले होते. संपूर्ण जमिनीचा भाव रु.८५,०००/- ठरले होते. सदर रक्कम दोन हप्त्यात दिले होते. आम्ही दुय्यम निबंधकासमोरही रक्कम दिली होती. त्यांच्यासमक्ष आम्ही किती रक्कम दिली होती हे मला आठवत नाही. सदर रक्कम मी स्वतः दिली होती. खरेदीखत झाल्यानंतर दुय्यम निबंधकाकडून ४-८ दिवसानी नोंद करुन घेतले होते. मुळ खरेदीखत माझ्याकडे आहे किंवा नाही हे मला आठवत नाही. सदर मुळ खरेदीखत माझ्याकडे आहे अथवा विश्वास यांच्याकडे आहे हे मी सांगू शकत नाही. दुय्यम निबंधक कार्यालयामध्ये मुळ कागदपत्रे मिळाल्याबाबत मी स्वतः सह्या केल्या आहेत. साक्षीदार पुन्हा सांगतो की, मी स्वतः सही केली होती किंवा नाही हे मला आठवत नाही. फेरफार मंजूर करण्यासाठी मी स्वतः तलाठ्याकडे मुळ खरेदीखत घेऊन गेलो होतो.

३. मी व माझा भाऊ २०१३ पासून वेगळे राहतो. आमच्या भावा-भावामध्ये वाटणी झालेली आहे. मुळ दस्त क्र.३३१३/२००२ न्यायालयात जमा करण्याबाबत आदेश झाला होता याबाबत मला माहिती नाही. मला सदर दस्त जमा करण्याबाबत कोणीही सांगितलेले नाही. सदर मुळ दस्त मला सापडल्यास मी दाखल करु शकतो. खरेदीखत नि.क्र.१०८ वर माझ्या पत्नीचा फोटो आहे. (प्रतिवादीच्या वकीलांनी सदर फोटो छायांकित असल्यामुळे सदर प्रश्नास आक्षेप घेतलेला आहे. प्रतिवादीच्या वकीलांनी घेतलेला सदरचा आक्षेप हा अंतिम

युक्तीवादाच्यावेळी विचारता घेतला जाईल.) सदर खरेदीखतावर फोटोच्या बाजुला असलेली सही माझ्या पत्नीचीच आहे. खरेदीखतावर पत्नीच्या फोटोखाली असलेला फोटो हा प्रतिवादी क्र.२ चा आहे, परंतु फोटोच्या बाजुला असलेली सही मी ओळखत नाही. अ.क्र.४ वर असलेला फोटो राजकुमार व गुंडेराव यांच्या आईचा आहे. अ.क्र.३ वर असलेला फोटो हा शत्रुघ्नचा आहे असा वाटतो, परंतु तो फोटो राजकुमारचाच आहे. नि.क्र.१२३/२ वर प्रतिवादी यांनी दाखल केलेला फोटो हा शत्रुघ्न यांचा आहे. नि.क्र.१२३/१ वर असलेले आधार कार्डचे झेरॉक्स हे प्रतिवादी क्र.३ ची आहे. सदर खरेदीखताच्या दिवशी विश्वास हजर होता किंवा नाही हे मला आठवत नाही.

४. मी, गुंडेराव, शत्रुघ्न व प्रभावती मिळून खोटे खरेदीखत करुन घेतल्यामुळे आमच्याविरुध्द कलम ४२० ची फौजदारी केस दाखल झाली असून सदर केसमध्ये मी जामीनवर आहे किंवा कसे हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर फौजदारी केसमध्ये माझे वकील हे गायकवाड वकीलच आहेत. हे म्हणणे खरे आहे की, शत्रुघ्न, गुंडेराव, प्रभावती, अविनाश, शिवाजी, दिलीप व विश्वास अशा सात लोकांविरुध्द फौजदारी केस प्रलंबित आहे. सदर फौजदारी केसमध्ये प्रभावती कधी कधी तारखेला हजर असते. हे म्हणणे खरे नाही की, राजकुमार दुय्यम निबंधक कार्यालयात हजर नसताना त्याच्या परस्पर आम्ही ७ लोकांनी खोटे खरेदखत करुन घेतले आहे. हे म्हणणे खरे नाही की, दुय्यम निबंधक कार्यालयात अधिकाऱ्यासमोर राजकुमार मीच आहे असे भासवून शत्रुघ्नने सही केली व अंगठा देखील केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत ही राजकुमार यांची नव्हती, गुंडेराव यांची होती. खरेदीखत आम्हाला गुंडेराव व इतर यांनी करुन दिले आहे. दावा मिळकतीचा ठराव हा गुंडेराव व राजकमार यांच्यासोबत झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत ही वाटणीमध्ये राजकुमार यांच्या हिश्याला आली होती. साक्षीदार पुन्हा सांगतो की, त्यांची वाटणी कशी झाली होती हे मला माहीत नाही. वादातील खरेदीखत किती वाजता झाले होते हे मला आठवत नाही.

५. राजकुमार व गुंडेराव यांच्यामध्ये सन २००० च्या पुर्वी वाटणी झालेली आहे. सन १९८८ ला राजकुमार व गुंडेराव यांच्यामध्ये वाटणी झाली याबाबत मला माहीत नाही. सन २००२ ला वाटणीप्रमाणे फेरफार मंजूर झाला होता किंवा नाही हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, वाटणीप्रमाणे फेरफाराचा अंमल झाला नव्हता, त्यामुळे खरेदीखत आम्ही गुंडेरावकडून करुन घेतला. कस्तुराबाई नागमोडे यांना मी ओळखत नाही. ती सिंधीजवळगाची राहणारी आहे. सन १९९३ ला गुंडेरावच्या हिश्याला आलेली जमीन त्याने कस्तुराबाई नागमोडे यांना विक्री केली होती, याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, सन २००० पुर्वीपासून राजकुमार व गुंडेराव यांचे व्यवहार वेगवेगळे होते. राजकुमार व गुंडेराव याच्या वाटणीच्यावेळी मी हजर नव्हतो. त्यांच्या हिश्याबाबत मला माहिती नाही. राजकुमार व गुंडेराव यांच्यात वाटणी झाल्याचे मला माहिती आहे. अर्जुन बिरादार, रा. भोपणी यांना मी ओळखतो. वामन जाधव हे माझे चुलते आहेत. शेषेराव जाधव यांना मी ओळखत नाही. गुडीपाडवा-१९८८ रोजी अर्जुन बिरादार, वामन जाधव व शेषेराव जाधव यांच्यासमक्ष गुंडेराव व राजकुमार यांच्या जमिनीची वाटणी झाली होती याबाबत मला माहिती नाही.

६. आम्ही सातजण मिळून खोटे दस्तऐवज तयार केल्याबाबत पोलीस आमच्याकडे

चौकशीला आले नव्हते. १७/७/२०१४ रोजी राजकुमार हा प्रतिवादी क्र.१ प्रभावती, गुंडेराव व शत्रुघ्न यांना खोटे दस्तऐवज तयार केल्याचे जाब विचारण्यास आला होता याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी, प्रभावती, गुंडेराव व शत्रुघ्न यांनी मिळून राजकुमारला जमिनीतून बेदखल करण्याची जुलै २०१४ मध्ये धमकी दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या सरतपासामध्ये राजकुमार, त्यांची आई सुंदराबाई व भाऊ यांच्यामध्ये वाटणी झाली होती परंतु फेरफार झाला नाही असे नमूद केले आहे. राजकुमारने खरेदीखतावर किती वाजता व किती वेळा सह्या केल्या होत्या हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीशी प्रभावतीचा काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रभावती कोर्टात आल्यावर ती सर्व खरी सांगेल अशी मला भिती वाटत असल्यामुळे मी तिच्याकडून अधिकार पत्र करुन घेतले आहे. मी प्रभावतीला साक्षीकामी हजर ठेवू शकत नाही. ती वेडी नसून चांगली आहे. हे म्हणणे खरे नाही की, गुंडेराव त्याच्या हिश्याची जमीन विक्री केली असून आम्ही गुंडेरावसोबत संगनमत करुन वाटणीचा फेरफार मंजूर झाला नसल्याचा गैरफायदा घेऊन राजकुमारच्या जागी शत्रुघ्न याला उभा करुन दावा मिळकतीपैकी १ हे. १ आर खोटे खरेदीखत करुन घेतले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा असून आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण. फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

Digitally signed by BHOSALE VRINDA DHANANJAY
Date: 2025.10.27 17:01:08 +0530

दि.२७/१०/२०२५

(**श्रीमती. व्ही. डी. भोसले**)
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, निलंगा.